Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - V Issue-X OCTOBER 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतींचे उत्पन्न व खर्च - सन २००५-०६ ते २०१५-१६

**प्रा.डॉ. संहिता आठवले**
(एम.ए.पीच.डी.)
टी.जे.आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, खडकी,पुणे.

**प्रा. अंगद हरिभाऊ भोंडवे**
(एम.ए., एम.फील., सेट)
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत

**प्रस्तावना :-**

ग्रामीण भागाच्या विकासासाठी सत्तेच्या विकेंद्रिकरणासाठी घटनेतील प्रकरण चार मधील ४० व्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रत्येक राज्यांनी आपापल्या सोयीनुसार स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण कराव्यात अशी सूचना केल्यामुळे प्रत्येक राज्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना केली. महाराष्ट्रात ग्रामपंचायतीसाठी इ.स. १९५८ मध्ये 'मुंबई ग्रामपंचायत अधिनियम-१९५८ व जिल्हा परिषद अधिनियम १९६१' नुसार महाराष्ट्रात पंचायत राज व्यवस्था सुरु झाली[3]. या कायदयानुसार गावपातळीवर ग्रामपंचायतींची स्थापना करण्यात आली. पंचायतराज व्यवस्थेतील गाव पातळीवर काम करणारे 'ग्रामपंचायत' ही महत्वाची संस्था आहे. केंद्र, राज्य व जिल्हा परिषद यांच्या विविध योजना ग्रामीण जनतेपर्यंत राबविणारी लोकशाही विकेंद्रीकरणातील तसेच तळागाळातील सर्वसामान्यांना मदतीचा हात देणार व ग्रामीण भागाच्या विकासात महत्वाची भूमिका निभावणारी यंत्रणा म्हणजे 'ग्रामपंचायत' होय.

**कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतींचे उत्पन्न :-**

कर्जत तालुक्यात नगर जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येपैकी २३५३८० लोकसंख्या रहाते. त्यापैकी ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात १९२३४५ (८१.७१टक्के) लोकसंख्या रहाते. कर्जत तालुक्यात ९१ ग्रामपंचायती आहेत. म्हणजेच नगर जिल्हयातील एकुण ग्रामपंचायतीपैकी ६.९४ टक्के ग्रामपंचायती कर्जत तालुक्यात आहे. नगर जिल्हयाच्या एकुण उत्पन्नापैकी ५.१९ टक्के उत्पन्न या तालुक्यातील ग्रामपंचायतींना मिळते. या ग्रामंपायतींना मिळणारे उत्पन्न पुढील तक्ता क्र. १ मध्ये दर्शविले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये:-**

१) कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाचा अभ्यास करणे.
२) कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या खर्चाचा अभ्यास करणे.

**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

**Vol - V Issue-X OCTOBER 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574**

### तक्ता क्र. १

### कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतींचे उत्पन्न

| वर्ष | अनुदाने | अंशदाने देणग्या बक्षिसे | जमिनी व इमारती वरील कर | दुकाने व हॉटेल यावरील कर | व्यावसाय कर | सर्व साधारण सफाई पटटी | पाणी पटटी | आठवडा बाजार व मार्केट यावरील कर | इतर कर | एकूण उत्पन्न | वृद्धी/ घट | प्रतिव्यक्ती कराचा बोजा | प्रति व्यक्ती उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| २००५-०६ | 8970097 | 7653855 | 4521843 | 21277 | 3915 | 282578 | 2408791 | 1499721 | 318893 | 25680970 | | 47.0874 | 133.515 |
| २००६-०७ | 10526316 | 6191512 | 3878615 | 34575 | 3470 | 230758 | 2128437 | 2352224 | 145337 | 25491244 | -0.739 | 45.6129 | 132.529 |
| २००७-०८ | 16960698 | 9137282 | 4233355 | 26178 | 4050 | 257637 | 237386 | 2451437 | 223815 | 33531838 | 31.543 | 38.6486 | 174.332 |
| २००८-०९ | 29808496 | 16967669 | 4510172 | 37271 | 43477 | 242115 | 2282398 | 2142975 | 249510 | 56284083 | 67.853 | 49.4316 | 292.62 |
| २००९-१० | 21595442 | 14219128 | 5345085 | 29505 | 2405 | 269183 | 2462986 | 2378735 | 236350 | 46538819 | -17.31 | 55.7553 | 241.955 |
| २०१०-११ | 28981495 | 14541719 | 7470864 | 40994 | 7450 | 279174 | 3143495 | 3291915 | 245430 | 58002536 | 24.633 | 75.2779 | 301.555 |
| २०११-१२ | 31449817 | 15112170 | 8844750 | 98541 | 9490 | 288817 | 4144943 | 3917419 | 292450 | 64158397 | 10.613 | 91.4836 | 333.559 |
| २०१२-१३ | 34692434 | 15868028 | 9986545 | 114178 | 13162 | 301497 | 4863483 | 4128835 | 249468 | 70217630 | 9.4442 | 102.197 | 365.061 |
| २०१३-१४ | 20906683 | 15609993 | 11660747 | 94204 | 224580 | 298638 | 4490669 | 4743202 | 0 | 58028716 | -17.36 | 111.841 | 301.691 |
| २०१४-१५ | 17870609 | 30629761 | 12539266 | 104853 | 127550 | 324481 | 4725504 | 6358730 | 12945 | 72693699 | 25.272 | 125.781 | 377.934 |
| २०१५-१६ | 12944703 | 20475971 | 9230186 | 97745 | 80856 | 243080 | 4624461 | 4916700 | 147520 | 52761222 | -27.42 | 100.551 | 274.305 |
| एकुण | 234706790 | 166407088 | 82221428 | 699321 | 520405 | 3017958 | 35512553 | 38181893 | 2121718 | 563389154 | -19.94 | 843.668 | 2929.06 |

*संदर्भ :- वार्षिक प्रशासन अहवाल सन २००५-१६ ते २०१५-१६ जिल्हा परिषद, अहमदनगर, परिशिष्ट अ, ग्रामपंचायतीचे कारभारावर अधारीत वार्षिक प्रशासन अहवाल प्रपत्र क आणि ड*

तक्ता क्र. १ वरुन कर्जत तालुक्यात अनुदाने हाच ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाचा सर्वात मोठा मार्ग आहे. २००५-०६ ते २०१५-१६ या कालावधीत या तालुक्यातील ग्रामपंचायतींना २३४७०६७९० रु. (४१.६६ टक्के) उत्पन्न मिळाले आहे. दुसरा उत्पन्नाचा महत्वाचा मार्ग म्हणजे अंशदाने, देणग्या व बक्षिसे हा होय. या मार्गापासून २९.५३ टक्के उत्पन्न ग्रामपंचायतींना मिळाले आहे. तर ८२२२१४२८ रु (१४.५९ टक्के) उत्पन्न जमिनी व इमारती वरील करापासून उत्पन्न मिळाले आहे. कर्जत तालुका कायम दुष्काळी असल्याने पाणीपट्टीपासून फक्त ६.३० टक्के उत्पन्न मिळाले आहे. मात्र आठवडा बाजारापासून इतर जिल्हयांच्या तुलनेत जास्त उत्पन्न मिळाले आहे. आठवडा बाजारापासून ३८१८१८९३ (६.७७ टक्के) उत्पन्न मिळाले आहे. या चार स्त्रोतापासून एकुण उत्पन्नाच्या ८९.०८ टक्के उत्पन्न मिळाले आहे. सफाई पट्टी, हॉटेल व दुकाने यावरील कर, व्यावसायकर, यापासून अत्यल्प उत्पन्न मिळाले आहे. पुढील आलेखावरुन कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतींना मिळालेले उत्पन्न दर्शविले आहे.

**आलेकख क्र. १**

**कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतीचे उत्पन्न**




आलेख क्रमांक १ वरुन कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतींना २०१४-१५ मध्ये ७२६१३६११ रु. एवढे सर्वाधिक उत्पन्न मिळाले आहे. तर सर्वात कमी उत्पन्न २००५-०६ या वर्षी मिळाले आहे. २००५-०६ ते २०१५-१६ या कालावधीत ग्रामपंचायतींच्या उत्पन्नात वाढ होत आहे. या कालावधीत एकुण उत्पन्न ५६३३८११५४ रु. मिळाले आहे. दरवर्षी सरासरी ५१२१७१९६ रु. उत्पन्न या तालुक्यातील ग्रामपंचयतींना मिळाले आहे. तर प्रति ग्रामपंचायत सरासरी ६१९१०९० रु. उत्पन्न २००५-०६ ते २०१५-१६ या कालावधीत मिळाले आहे. म्हणजेच प्रति ग्रामपंचायत प्रतिवर्षी ५६२८२६.३० रु. उत्पन्न मिळाले आहे.

कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रातील लोकांवर या कालावधीत प्रतिव्यक्ती ८४३.६६ रु. कराचा भार पडला आहे. तर प्रतिव्यक्ती २९२४.०६ रु. उत्पन्न मिळाले आहे.

## कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतीचा खर्च

अहमदनगर जिल्हयातील एकुण ग्रामपंचायतींच्या ९१ (६.९४ टक्के) ग्रामपंचायती कर्जत तालुक्यात आहेत. जिल्हयाच्या ग्रामपंचायतींच्या एकूण खर्चापैकी ५.४४ टक्के खर्च या ग्रामपंचायती करतात. या ग्रामपंचायतींना मिळालेल्या ५६३३८११५४ रु. उत्पन्नापैकी ५१५६५३४९१ रु. (९१.५२ टक्के) उत्पन्न संशोधन काळात केले आहे. २००५-०६ ते २०१५-१६ या कालावधीत ८.४७ टक्के उत्पन्न ग्रामपंचायती खर्च करू शकल्या नाहीत. पुढील तक्त्यात कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतींचा खर्च दर्शविला आहे.

### तक्ता क्र.२
### कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतींचा खर्च

(आकडे रु. मध्ये)

| वर्षे | स्वचछता व आरोग्यावरील खर्च | सार्वजनिक बांधकामा वरील खर्च | शिक्षण, सामाजिक, सांस्कृतिक कार्यावरील खर्च | आत्म संरक्षण व ग्राम संरक्षणावरील खर्च | प्रशासना वरील खर्च | लोककल्याण विषयक कार्यावरील खर्च | कषी, वन संरक्षण व पशुसंवर्धन कार्यावरील खर्च | एकूण खर्च | वृद्धी/ घट | दरडोई खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| २००५-०६ | 6459010 | 8804910 | 639714 | 0 | 8307344 | 1100 | 1300 | 24213378 | | 125.89 |
| २००६-०७ | 2763044 | 8983300 | 699139 | 0 | 8232677 | 1395 | 3000 | 20682555 | -14.5821 | 107.53 |
| २००७-०८ | 9289017 | 10231250 | 953953 | 2380 | 7734298 | 14000 | 1000 | 28225898 | 36.47201 | 146.75 |
| २००८-०९ | 8402324 | 20721634 | 750605 | 0 | 17044774 | 60470 | 2200 | 46982007 | 66.45 | 244.26 |
| २००९-१० | 10169367 | 19505471 | 1953382 | 0 | 17442569 | 11100 | 0 | 49081889 | 4.469545 | 255.18 |
| २०१०-११ | 11276417 | 21814902 | 1714804 | 0 | 18842615 | 45613 | 0 | 53694351 | 9.397483 | 279.16 |
| २०११-१२ | 13332914 | 30215142 | 1814900 | 0 | 19856116 | 13467 | 0 | 65232539 | 21.48864 | 339.14 |
| २०१२-१३ | 14252361 | 35396081 | 2009179 | 17325 | 20418446 | 108128 | 46430 | 72247950 | 10.75447 | 375.62 |
| २०१३-१४ | 10869792 | 21166145 | 2332127 | 386015 | 19821191 | 111145 | 0 | 54686415 | -24.3073 | 284.31 |
| २०१४-१५ | 11340623 | 2219418 | 2729743 | 0 | 21840073 | 589738 | 0 | 38719595 | -29.1971 | 201.30 |
| २०१५-१६ | 13501273 | 18527140 | 2176243 | 0 | 27403100 | 279166 | 0 | 61886922 | 59.8336 | 321.75 |
| एकुण | 111656142 (21.65) | 197585393 (38.31) | 17773789 (3.44) | 405720 (0.07) | 186943203 (36.25) | 1235322 (0.23) | 53930 (0.01) | 515653499 (100) | 140.77 | 2680.88 |

संदर्भ :- वार्षिक प्रशासन अहवाल, सन २००५-०६ ते २०१५-१६ जिल्हा परिषद, अहमदनगर, परिशिष्ट अ,

ग्रामपंचायतीचे कारभारावर आधारीत वार्षिक प्रशासन अहवाल प्रपत्र ई.

वरील तक्त्यावरून कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायती सर्वाधिक १९७५८५३९३ रु. (३८.३१ टक्के) खर्च सार्वजनिक बांधकामावर करतात. ३६.२५ टक्के प्रशासनावर केला आहे. तर स्वच्छता व आरोग्यावर (२१.२५टक्के) खर्च केला आहे. या तालुक्यातील ग्रामपंचायतींच्याही खर्चाचे तीन घटक महत्वाचे आहेत. या तीन घटकांवर एकूण खर्चाच्या ९६.२२ टक्के खर्च ग्रामपंचायती करतात व उर्वरित खर्च शिक्षण, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम (३.४४ टक्के) आत्मसंरक्षण व ग्राम संरक्षणावर (०.०७ टक्के) लोककल्याण विषयक कार्यावर (०.२३ टक्के) कृषी, वनसंरक्षण व पशु सवंर्धन यावर (०.०१ टक्के) खर्च कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायती करतात. या ११ वर्षाच्या कालावधीत कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतींनी ५१५६५३४९९ रु. खर्च केला आहे. पुढील आलेखात कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची प्रवृत्ती दर्शविली आहे.

**आलेख क्र. २**

**कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतींचा खर्च**




वरील आलेखावरून २००६-०७ चा अपवाद वगळता २००५-०६ ते २०१२-१३ पर्यंत ग्रामपंचायतीच्या खर्चात सातत्याने वाढ झाली आहे. त्यानंतर २००६-०७ मध्ये ग्रामपंचायतींच्या खर्चात -१४.५८ टक्के घट झाली आहे. त्यांनतर २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये अनुक्रमे -२४.३० टक्के व -२९.१९ टक्के घट झाली आहे. परंतु २००५-०६ ते २०१५-१६ या कालावधीत कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या खर्चात १४०.७७ टक्के वाढ झाली आहे. या कालावधीत प्रतिवर्ष ४६८७७५९०.८२ रु. खर्च केला आहे. तर प्रतिवर्षी प्रति ग्रामपंचायत ५१५१३८.३६ रु. खर्च केला आहे. या तालुक्यातील ग्रामपंचायतींनी २००५-०६ ते २०१५-१६ या कालावधीत दरडोई २६८०.८८ रु. खर्च केला आहे. तर प्रतिवर्ष दरडोई २४३.७१ रु. खर्च केला आहे.

**संदर्भ :-**

१) जे.ई. पवार, व्ही.ए.कड, चंद्रशेखर यादव (२००४) 'पंचायतराज संस्थांचे प्रशासकीय व आर्थिक व्यवस्थापन' यशदा पुणे, पान नं. २६.
२) महाराष्ट्राची आर्थिक पहाणी २०१५ – १६, अर्थ व सांख्यिमी संचालनालय, महाराष्ट्र शासन, पान नं. ०३.
३) वार्षिक प्रशासन अहवाल, सन २००५-०६ ते २०१५-१६ जिल्हा परिषद, अहमदनगर, परिशिष्ट अ, ग्रामपंचायतीचे कारभारावर आधारीत वार्षिक प्रशासन अहवाल प्रपत्र ई.
४) http://panchayat.gov.in
५) www.financecommission.in
6) www.maharshtra.gov.org